# मेट्रो ३च्या चाचणीचा मार्ग अखेर मोकळा

## उर्वरित चार डबे मुंबईत दाखल



**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ मेट्रो ३ या मार्गिकेवरील आठ डब्यांच्या पहिल्या मेट्रो गाडीचे चार डबे मंगळवारी पहाटे मुंबईत दाखल झाले होते. त्यानंतर आता उर्वरित चार डबे शुक्रवारी पहाटे मरोळ-मरोशी येथील तात्पुरत्या कारशेडमध्ये दाखल झाले. यामुळे या मार्गिकेवरील मेट्रो चाचणीचा मार्ग अखेर मोकळा झाला.

येत्या दोन दिवसांत मेट्रो गाडीच्या आठही डब्यांची जोडणी करण्यात येणार असून त्यानंतर तीन किमीपर्यंत गाडीची चाचणी घेण्यात येईल.

मेट्रो ३ चा सीप्झ ते बीकेसी हा पहिला टप्पा २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट 'एमएमआरसी'चे आहे. त्यासाठी सर्वप्रथम कारशेडचा प्रश्न मार्गी लावणे अत्यंत गरजेचे होते. त्यानुसार आरेत कारशेड बांधण्याचा निर्णय पुन्हा घेण्यात आला आहे. तर आता मेट्रो गाडीची चाचणीही करण्यात येणार आहे. दरम्यान, काही आठवड्यांपासून आंध्र प्रदेशातील श्रीसिटी येथील कारखान्यातून मेट्रो गाडी मुंबईत आणण्याची प्रक्रिया सुरू केली होती. त्यानुसार १७ जुलैला चार डबे मुंबईच्या दिशेने रवाना झाले होते. ते मंगळवारी पहाट दाखल झाले. उर्वरित चार डबेही शुक्रवारी दाखल झाले आहेत. येत्या दोन दिवसांत या डब्यांच्या गाडीची जोडणी करण्यात येणार असून तात्पुरती कारशेड (सारिपुत नगर) ते मरोळ नाका या दरम्यान तीन किमीच्या मार्गावर चाचणी घेण्यात येणार आहे, असे 'एमएमआरसी'कडून सांगण्यात आले आहे.